अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शनिवार, दि. २९ जुलै २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : ३०० वा किंमत : ५ रुपये | पाने ८

## पावसाळी अधिवेशन संपायला आले, अद्याप विरोधी पक्षनेत्याची निवडच नाही

**मुंबई :** विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या शेवटच्या आठवड्यातील अवघे तीन दिवस उरले आहेत. मात्र, अजूनही विधानसभा विरोधी पक्ष नेतेपदाच्या नावावरती शिक्का मोर्तब झालेलं नाही. विधानसभेचा विरोधी पक्षनेता कोणाला करायचं हा निर्णय काँग्रेसच्या हायकमांडकडे अडकलेला पाहायला मिळतोय.

मात्र या संदर्भात राज्यातील नेत्याला या संदर्भात काहीच कल्पना नसल्याचे अनेक महत्त्वाचे नेते खाजगीत सांगताना पाहायला मिळत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर काँग्रेसला विधानसभेचे विरोधी पक्ष नेतेपद मिळणार यावरती शिक्कामोर्तब झालं आहे. त्यानंतर मात्र काँग्रेसचे अनेक नेत्यांना आपण विरोधी पक्ष नेते होणार याची स्वप्न पडू लागली. एवढेच नाही तर अनेक नेते या आशेने सभागृहात आक्रमक भूमिका घेताना पाहायला मिळत आहे. मात्र, पावसाळी अधिवेशन संपायला अवघे तीन दिवस उरलेले असतानाही विरोधी पक्षनेत्याच्या नावावरती शिक्कामोर्तब होऊ शकलेला नाही. लवकरच यावर निर्णय होईल असं काँग्रेसचे नेते सांगत आहेत. काँग्रेसच्या पहिल्या फळीतील नेत्याला विरोधी पक्षनेता करण्याची चर्चा सुरु होती. त्यानंतर दुसऱ्या फळीतील विजय वडेट्टीवार, यशोमती ठाकूर, सुनील केदार आणि संग्राम थोपटे यांच्या नावाची चर्चा सुरू झाली. त्यात संग्राम थोपटे यांनी ३० आमदारांच्या समर्थनाचे पत्र दिल्लीमध्ये पाठवलं. त्यामुळे आमदारांच समर्थन लक्षात घ्यायच की आणखी काही निर्णय घ्यायचा हा प्रश्न निर्माण झाला आहे.

## ‘ऑरेंज’ शहर हादरले, ‘ब्लॅकमनी’चे आमिष भोवले

# गुंडांनी दोघा व्यावसायिकांना फार्महाऊसवर गोळ्या घालून संपवले

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**महाराष्ट्राची उपराजधानी नागपूरची ‘ऑरेंज सिटी’ अशी ओळख आहे. परंतु गेल्या काही महिन्यांमध्ये शहरात गुन्हेगारीचे वाढलेले प्रकार पाहता क्राईम सिटीची डाग या शहराला लागतोय की काय? अशी भीती व्यक्त केली जातेय. २ कोटी ८० लाख रुपयांचा ब्लॅक मनी व्हाईट करण्याच्या मोहापायी नागपूरमधील दोन व्यापाऱ्यांनी आपला जीव गमावला. ३ कोटींचा ब्लॅक मनी व्हाईट करण्याचे सांगून गुंडांनी दोघा व्यापाऱ्यांचे अपहरण केले. पैशाचा वाद झाल्यानंतर फार्महाऊसवरच गोळ्या घालून त्यांची हत्या केली गेली. त्यानंतर अंगावर पेट्रोल ओतून त्यांचे मृतदेह नदीत फेकून दिले. पोलिसांच्या तपासात गुरूवारी हे अमानुष हत्याकांड उघडकीस आल्यानंतर नागपूर शहर पार हादरून गेले.**





एखाद्या हिंदी चित्रपटाचा कथानक वाटावा अशा प्रकारे नागपूरमध्ये गुंडाच्या एका टोळीने दोन व्यापाऱ्यांची हत्या केली. निराला कुमार व अमरीश गोळे अशी हत्या झालेल्या व्यावसायिकांनी नावे आहेत. निराला कुमार यांचा ऑनलाइन व्यापार होता तर अंबरीश गोळे हे बांधकाम व्यावसायिक होते. या प्रकरणातील मुख्य आरोपी २५ वर्षीय ओंकार तलमले याची दोन्ही व्यावसायिकांसोबत ओळख होती. ओंकारचा फर्निचरचा व्यवसाय आहे. आमच्याकडे मोठ्या प्रमाणात ब्लॅक मनी असून तो व्हाईट करायचा आहे, अशी बतावणी त्याने केली. त्यात दुसरा आरोपी २२ वर्षीय हर्ष वर्मा हा देखील सामील झाला.

या २ कोटी ८० लाख रुपयांच्या मोबदल्यात १ कोटी ५० लाख देण्यास निराला कुमार सिंग आणि अंबरीश गोळे तयार झाले. एका हाताने पैसे द्या आणि दुसऱ्या हाताने त्याचे व्हाईट करून घेण्यासाठी आरोपींनी त्यांच्या नावे अगोदरच दीड कोटी रुपयांचा डीडी तयार करायला सांगितला. निराला कुमार सिंग आणि गोळे यांनी हा डीडी तयार केला. त्यानंतर गुरुवारी दुपारच्या सुमारास ते नागपूरच्या सिव्हिल लाईन परिसरात एका ठिकाणी आरोपींसोबत भेटले.

आरोपींनी निराला सिंग आणि गोळे यांना पैसे देण्याचे आमिष दाखवून नागपूर अमरावती महामार्गावरील कोंढाळी गावानजीकच्या लकी तुरकेल याच्या फार्म हाऊसवर घेऊन गेले. फार्म हाऊसवर गेल्यावर २ कोटी ८० लाख रुपये थोड्याच वेळात एक जण घेऊन येत आहे, अशी बतावणी करून दोघांनाही एका खोलीत बसवले. बराच वेळ होऊनही कोणीच पैसे घेऊन आले नाही, त्यामुळे निराला सिंग आणि गोळे यांना संशय आला. त्यांनी तिथून निघून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र भीती पोटी आरोपींनी त्यांच्यावर गोळी झाडली. त्यामुळे घटनास्थळी दोघांचाही मृत्यू झाला.

मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी आरोपींनी सुरुवातीला मृतदेह जाळण्याचे ठरवले. मात्र त्यावेळी पाऊस असल्याने मृतदेह पूर्णपणे जळाला नाही. त्यानंतर तिथून काही किलोमीटर अंतरावर असलेल्या वर्धा नदीत दोघांचेही मृतदेह फेकून दिले. तिकडे रात्रीपर्यंत घरी न परतल्याने दोघांच्याही कुटुंबीयांनी पोलिसात धाव घेतली पोलिसांनी मिसिंगचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. त्यावेळी हे दोघे शेवटच्या वेळी आरोपी ओमकार तलमले यांच्यासोबत दिसल्याचे समोर आले. पोलिसांनी ओमकार तलमलेला ताब्यात घेतल्यावर संपूर्ण धक्कादायक घटना उघडकीस आली. धक्कादायक बाब म्हणजे आरोपीकडे कुठलीही रोख रक्कम नव्हती, ज्यासाठी ही घटना घडली.

### असा लागला छडा...

ओंकार हा नेमबाज, तर लकी हा कुख्यात गुन्हेगार आहे. लकीच्या वडिलाचे कोंढाळीत फार्म हाऊस आहे. ओंकार याची निराला व अंबरीश यांच्यासोबत ओळख होती. निराला यांनी २५ जुलैला रात्री पत्नीच्या मोबाइलवर संपर्क साधून ‘वाडीतील हॉटेलमधून जेवण करून परत येतो’, असे सांगितले. ते परत आले नाही. अंबरीशही बेपत्ता होते. दरम्यान, दोघांच्याही नातेवाइकांनी सोनेगाव व सीताबर्डी पोलिसांत तक्रार दिली. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज तपासले. यावेळी दोघांसोबत लकी असल्याचे पोलिसांना आढळले. पोलिसांनी आधी लकी व नंतर अन्य मारेकऱ्यांना ताब्यात घेतले. गुरुवारी पोलिसांनी शोध घेतला असता अंबरिश यांचा मृतदेह तळेगाव जवळील वर्धा नदीत आढळला. तर, निराला यांच्या मृतदेहाचा शोध सुरू आहे. या हत्याकांडाचा सूत्रधार ओंकार असून तो पुण्याला असल्याचे पोलिसांना कळाले. पोलिसांनी पुणे पोलिसांच्या मदतीने त्याला नागपुरात आणले.

### २४ तासांत चौघांची हत्या...

मागील २४ तासात नागपूर शहरात दोन तर नागपूर ग्रामीण परिसरात दोन हत्या झाल्या. एकाच दिवसात चार हत्यांच्या घटनेने नागपूर जिल्हा हादरला आहे. पहिल्या घटनेत भावानेच आपल्या मनोरुग्णा बहिणीची हत्या केली. तर दुसऱ्या घटनेत अल्पवयीन मुलाने ४० वर्षीय इसमाची हत्या केली. आणखी एका घटनेत पैशांच्या वादातून दोन तरुण व्यापाऱ्यांचे अपहरण करुन हत्या करण्यात आली. या तिन्ही प्रकरणाचा तपास नागपूर पोलिसांकडून सुरु आहे.



## दौंडमधून विसर्ग पुन्हा वाढला

**सोलापूर :** उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात अजूनही पाऊस पडत आहे तसेच धरणाच्या वरती असलेल्या पुणे जिल्ह्यातील धरण परिसरात पर्जन्यवृष्टी सुरू असल्याने काही धरणांमधून पाणी सोडले जात आहे.त्याचा लाभ उजनी धरणाला होत आहे.शुक्रवारी सायंकाळी सहा पर्यंत दौंडमधून २२ हजार२४९ क्युसेकचा विसर्ग धरणात येवून मिसळत होता. हा फ्लो कमी झाला होता. धरणातील पाण्याची पातळी वजा दहापर्यंत आली आहे.दौंडमधून असाच फ्लो कायम राहिला तर पाण्याची पातळी प्लसमध्ये जायला सुरूवात होईल.

## सहाय्यक पोलीस आयुक्तांच्या नावाने बनवले फेक अकाऊंट

सुराज्य/सोलापूर

सोलापूर शहर पोलीस दलातील सहायक पोलीस आयुक्त दीपक आर्वे यांचा फेसबुक अकाऊंट हॅक करून त्याच नावाच बनावट फेसबुक आयडी तयार करण्यात आलं आहे.सहायक पोलीस आयुक्त दीपक आर्वे यांचा मित्र आहे,असे भासवून ६० हजार रुपयांची रक्कम ऑनलाइन रित्या मागवून घेतली गेली आहे.दीपक आर्वे हे सोलापूर शहर पोलीस आयुक्तालयात सहायक आयुक्त पदावर कार्यरत आहेत.

सहायक पोलीस आयुक्तांच्या मित्राने ज्यावेळी फोन वरून संपर्क साधून माहिती घेतली असता,खरी माहिती उघडकीस आली.एसीपी दीपक आर्वे यांनी त्यांच्या मित्राला ताबडतोब पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार नोंदवण्याचा सल्ला दिला.इतर फेसबुक युजर्सना आवाहन केले आहे.फेसबुक नेहमी हे लॉक ठेवावे,आणि ओळखीच्याच लोकांची फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारावी,असेही आवाहन देखील त्यांनी केले आहे.

### फेसबुक नेहमीच लॉक ठेवावे

फसवणुकीची बाब समोर आल्यानंतर दीपक आर्वे यांनी नागरिकांनी फेसबुक हे नेहमी लॉक ठेवावे,तसेच अनोळख्या व्यक्तीची रिक्वेस्ट स्वीकारू नये,तसेच कोणत्या मित्राने फेसबुक फ्रेंड रिक्वेस्ट पाठवली तर,फोन वरून संपर्क साधून खात्री करावी असे आवाहन केले आहे.



सोलापूर शहर पोलीस दलातील सहायक पोलीस आयुक्त दीपक आर्वे यांना २६ जुलै रोजी सकाळी त्यांचं पुण्यातील चंद्रशेखर या मित्राचा फोन आला. चंद्रशेखर यांनी एसीपी दीपक यांना सांगितले, तुमच्या मित्राला २५ हजार टाकायचे आहेत का? अगोदरच ६० हजार रुपये दिले आहेत.हा सगळा प्रकार समोर आल्यानंतर एसीपी दीपक आर्वे यांना काय घडलं असावं ते समजलं. त्यांच्या नावाने कोणत्या तरी अज्ञात व्यक्तीने बनावट फेसबुक तयार केले आहे आणि माझ्या सर्व मित्राना फ्रेंड रिक्वेस्ट पाठवत आहे, हे समोर आलं.

## निवृत्त सरन्यायाधीश उदय लळीत तीन दिवस सोलापुरात

**सोलापूर :** सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त सरन्यायाधीश व सोलापूरचे सुपूत्र उदय लळीत हे सोमवार, ३१ जुलैपासून तीन दिवस सोलापूर दौर्यावर येत असून दोन दिवस त्यांचा सोलापुरात मुक्काम राहणार आहे.

लळीत हे सोमवारी दुपारी एक वाजता पुणे येथून मोटारीने सोलापूरकडे निघणार आहेत. सायंकाळी ५.४५ वाजता त्यांचे सोलापुरात आगमन होणार आहे. यादिवशी त्यांचा होटगी रस्त्यावरील हॉटेल बालाजी सरोवर येथे मुक्काम राहणार आहे. मंगळवार, १ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता हुतात्मा स्मृती मंदिरात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्यावतीने आयोजित केलेल्या जीवन गौरव पुरस्कारासह इतर विविध पुरस्कार वितरण समारंभासाठी ते उपस्थित राहणार आहेत. या समारंभात लळीत यांना विद्यापीठाच्यावतीने जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. सायंकाळी पाच वाजता गुजराती भवन येथे रोटरी क्लबने आयोजित केलेल्या कार्यक्रमास ते उपस्थित राहणार आहेत. २ ऑगस्ट रोजी सोयीने मोटारीने ते पुण्याकडे रवाना होणार आहेत.



## राज्यभर पाऊस पण सोलापूर जिल्हा तहानलेलाच
## माळशिरस व सांगोल्यात अद्यापही नऊ टँकर सुरु

सुराज्य/सोलापूर

राज्यात सगळीकडे पावसाने हाहाकार उडवून दिल्याने ठिकठिकाणी महापूर आला असताना अजूनही सोलापूर जिल्हा मात्र तहानलेलाच असल्याचं चित्र आहे. माळशिरस आणि सांगोला तालुक्यात पिण्याच्या पाण्यासाठी नऊ टँकर सुरू ठेवावे लागत आहेत. यंदा पावसाने जिल्ह्याकडे सपशेल पाठ फिरविल्याने पेरण्या करणे तर दूरच, पण माणसांच्या आणि जनावरांच्या पिण्याच्या पाण्यासाठी गेल्या दोन महिन्यापासून टँकरने पाणीपुरवठा सुरु आहे.

कमी पावसाचा फटका माळशिरस तालुक्यातील पूर्व भागाला जास्त बसला असून कायम दुष्काळी अशी ओळख असलेल्या या भागातील ग्रामस्थांना जगण्यासाठी आता स्थलांतर करायची वेळ येऊ लागली आहे. माळशिरस तालुक्यातील गारवाड , शिंगोर्णी, बचेरी, मगरवाडी, सुळेवाडी, भाम, माणकी, जळभावी, फडतरी, निरवेवाडी, लोंढेवाडी या अकरा गावात सध्या आठ टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे.




कायम दुष्काळी असणाऱ्या सांगोल्यात इटकी येथेही टँकर सुरु. स्वामी समर्थांच्या वास्तव्याने पुनीत झालेल्या अक्कलकोटची अवस्था देखील अशीच चिंताजनक बनली असून येथील कुरनूर धरणात केवळ सात टक्के पाणीसाठा राहिला असून शहराला १० ते १२ दिवसांत एकवेळ कसा तरी पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांनाही खाजगी टँकरवर अवलंबून रहावे लागत आहे. वरुणराजाने सोलापूर जिल्ह्याकडे पाठ फिरविल्याने या भागात दुष्काळाची टांगती तलवार आहे.

### दत्ता सामंत हत्या प्रकरण...
## सबळ पुराव्याअभावी छोटा राजन निर्दोष

**मुंबई :** कामगार नेते दत्ता सामंत यांच्या हत्या प्रकरणातून कुख्यात गुंड छोटा राजनची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. सबळ पुराव्यांअभावी विशेष सीबीआय न्यायालयाने छोटा राजन याची हत्येच्या आरोपातून सुटका केली.



१६ जानेवारी १९९७ रोजी दत्ता सामंत हे जीपमधून पवईहून घाटकोपरकडे जात असताना विक्रोळी येथील पद्मावती रोडवर दुचाकींवर आलेल्या चौघांनी त्यांची जीप अडवली आणि त्यांच्यावर गोळयांचा वर्षाव करत त्यांची हत्या केली होती. दत्ता सामंत यांच्यावर हल्लेखोरांनी एकूण १७ गोळ्या झाडल्या होत्या. त्यानंतर हल्लेखोर घटनास्थळावरुन फरार झाले होते. या घटनेनंतर डॉ. सामंत यांचा चालक भीमराव सोनकांबळे यांच्या फिर्यादीवरून साकीनाका पोलिस ठाण्यात चार अज्ञात हल्लेखोरांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. छोटा राजनचे २०१५मध्ये प्रत्यार्पण झाल्यानंतर दत्ता सामंत यांच्या हत्येशी संबंध असल्याच्या आरोपावरून सीबीआयने त्याच्याविरोधात खटला दाखल केला होता. मात्र, त्या हत्येच्या घटनेत छोटा राजनचा संबंध दाखवणारे ठोस पुरावे नसल्याचे निरीक्षण नोंदवत विशेष सीबीआय न्यायालयाने शुक्रवारी त्याची सुटका केली. छोटा राजनला ऑक्टोबर२०१५ मध्ये इंडोनेशियातील बाली येथून अटक करण्यात आली होती. तेव्हापासून छोटा राजन सीबीआयच्या कोठडीत आहे. सीबीआयने छोटा राजन याच्यावर दाखल असलेल्या सर्व गुन्ह्यांच्या प्रकरणाचा तपास स्वत:कडे घेतला होता.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



लगेच आमच्याकडे बघू नका !!!

कल्याण
459-86-880

मेन बाजार
457-61-489

# अधिकमास एकादशीसाठी पंढरपुरात पाच लाख भाविक
## भाविकांची गर्दी पाहाता जणू एकाच महिन्यात भरणार दुसरी आषाढी

सुराज्य/पंढरपूर

दर तीन वर्षातून येणार अधिक मास अर्थात पुरुषोत्तम मास हा वारकरी संप्रदायाची पर्वणी काळ असतो. यात शनिवारी होणाऱ्या अधिक महिन्यातील एकादशी असल्याने लाखो भाविकांनी पंढरपूरमध्ये गर्दी केली आहे. तसे तर अधिक महिना सुरु झाल्यापासून शहरात रोज दोन लाखापेक्षा जास्त भाविक येत आहेत. यातच शनिवार, रविवार या जोडून सुट्ट्या आल्यावर हा एकदा तीन ते चार लाखापर्यंत जात आहे. शनिवारी या पुरुषोत्तम मासातील एकादशी असल्याने ही



पर्वणी गाठण्यासाठी पाच लाखापेक्षा जास्त भाविक सध्या पंढरपूरमध्ये दाखल झाले असून अजूनही हजारोंच्या संख्येने भाविकांचे येणे सुरूच आहे. यामुळे आज विठुरायाच्या दर्शनाची रांग थेट गोपाळपूर येथील तिसऱ्या पत्राशेडपर्यंत गेली असून डोक्यावर रिमझिम पाऊस सुरु असूनही भाविक दर्शन रांगेत गर्दी करत आहेत. शुक्रवारपासून चंद्रभागेच्या पवित्र स्नानासाठी हजारो भाविकांनी वाळवंटात गर्दी केली होती. मंदिर परिसर, चंद्रभागा वाळवंट, प्रदक्षिणा मार्ग आणि दर्शन रांगेत तुफान गर्दी दिसत असल्याने एका महिन्यात दुसरी आषाढी आल्याचे चित्र दिसू लागले आहे. दरम्यान शुक्रवारपासून मंदिर समितीच्या वतीने दर्शन रांगेतील भाविकांना नाश्ता आणि चहाचे वाटप सुरु करण्यात आले आहे.

### ३० पूजा बंद करण्याचा निर्णय

अधिक महिन्यासाठी विठुरायाच्या रोज होणाऱ्या ४५ तुळशी अर्चन पूजेपैकी ३० पूजा बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. एबीपी माझाच्या दणक्यानंतर हा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता जास्तीत जास्त भाविकांना देवाच्या दर्शनाचा लाभ घेता येणार आहे.

### १० पाद्यपूजा बंद करण्याचा निर्णय

अधिक मास काळात रोज होणाऱ्या १० पाद्यपूजा बंद करण्याचा निर्णय झाला होता. मात्र रोज होणाऱ्या ४५ तुळशी अर्चन पूजेबाबत मात्र कोणताच निर्णय न झाल्याने भाविकांना दर्शन रांगेत तिष्ठत थांबावे लागणार होते. याबाबत भाविकांच्या भावनांना एबीपी माझाने वाचा फोडल्यानंतर अखेर मंदिर समितीने रोज होणाऱ्या ४५ पैकी ३० पूजा बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

### मिळणारा वेळ वाढणार

हा पुरुषोत्तम मास यावर्षी चातुर्मासाच्या कालावधीत येत असल्याने रोज यात्रेसारखी भाविकांची गर्दी असते. अशावेळी जास्तीत जास्त भाविकांना दर्शनासाठी वेळ मिळावा म्हणून महिनाभर रोजच्या ४५ तुळशी अर्चन पूजा बंद करण्याची मागणी भाविकांतून होत होती. आता मंदिराने रोजच्या ३० पूजा रद्द केल्याने भाविकांना दर्शनासाठी मिळणारा वेळ वाढणार आहे.